प्रेस रिलीज

# भारतीय रस्त्यांवरील गेल्या 6 वर्षांतील सर्वात सुरक्षित वाहन म्हणून ‘महिंद्रा एक्सयूव्ही300’ला ‘ग्लोबल एनसीएपी’कडून मान्यता

- ‘महिंद्रा एक्सयूव्ही300’ला आणखी एक जागतिक सुरक्षा मान्यता प्रदान
- 2014-2020 दरम्यान चाचणी घेतलेल्या सर्व वाहनांमध्ये सर्वाधिक प्रवासी सुरक्षितता मानांकन



#SAFERCARSFORINDIA

| RESULTS 2014 - 2020 | | | |
|---|---|---|---|
| Mahindra XUV300 | ✓2 | ★★★★★ | ★★★★☆ |
| Tata Altroz | ✓2 | ★★★★★ | ★★★☆☆ |
| Tata Nexon* | ✓2 | ★★★★★ | ★★★☆☆ |
| Tata Nexon | ✓2 | ★★★★☆ | ★★★☆☆ |
| Tata Tigor/Tiago | ✓2 | ★★★★☆ | ★★★☆☆ |
| Volkswagen Polo | ✓2 | ★★★★☆ | ★★★☆☆ |
| Mahindra Marazzo** | ✓2 | ★★★★☆ | ★★☆☆☆ |
| Toyota Etios | ✓2 | ★★★★☆ | ★★☆☆☆ |
| Suzuki Maruti Vitara Brezza | ✓2 | ★★★★☆ | ★★☆☆☆ |
| Tata Zest | ✓2 | ★★★★☆ | ★★☆☆☆ |
| Suzuki Marut Ertiga | ✓2 | ★★★☆☆ | ★★★☆☆ |
| Ford Aspire | ✓2 | ★★★☆☆ | ★★☆☆☆ |
| Honda Mobilio | ✓2 | ★★★☆☆ | ★★☆☆☆ |
| Renault Duster | ✓1 | ★★★☆☆ | ★★☆☆☆ |
| Suzuki Maruti Swift | ✓2 | ★★☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Suzuki WagonR | ✓1 | ★★☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Hyundai Santro | ✓1 | ★★☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Datsun Redigo | ✓1 | ★☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Renault Kwid (IV) | ✓1 | ★☆☆☆☆ | ★☆☆☆☆ |
| Volkswagen Polo | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★★☆☆ |
| Renault Kwid (I) | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Renault Kwid (II) | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Renault Kwid (III) | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Ford Figo | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Suzuki Maruti Eeco | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Hyundai Eon | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Suzuki Maruti Alto | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Renault Duster | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Mahindra Scorpio | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Renault Lodgy | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Datsun Go | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Chevrolet Enjoy | ✕ | ☆☆☆☆☆ | ★★☆☆☆ |
| Tata Zest | ✕ | ☆☆☆☆☆ | ★☆☆☆☆ |
| Suzuki Maruti Celerio | ✕ | ☆☆☆☆☆ | ★☆☆☆☆ |
| Honda Mobilio | ✕ | ☆☆☆☆☆ | ★☆☆☆☆ |
| Suzuki Maruti Swift | ✕ | ☆☆☆☆☆ | ★☆☆☆☆ |
| Hyundai i10 | ✕ | ☆☆☆☆☆ | ★☆☆☆☆ |
| Tata Nano | ✕ | ☆☆☆☆☆ | ☆☆☆☆☆ |

GLOBAL NCAP FOR SAFER CARS

#STOP THE CRASH

*This result is valid for all Nexon units produced as from December 7th, 2018 (from VIN MAT627165JLP51255)*
*** This result is valid for all Marazzo units produced as from November 16th, 2018 (from VIN MA1WA2ES1J2L11253)*

**मुंबई, 15 जुलै, 2020 :** ‘ग्लोबल एनसीएपी’च्या सहा वर्षांच्या सुरक्षा क्रमवारीत ‘महिंद्रा’ची ‘एक्सयूव्ही300’ ही ‘कॉम्पॅक्ट एसयूव्ही’ अव्वल ठरली आहे. ‘ग्लोबल एनसीएपी’ने 2014 ते 2020 या कालावधीत चाचण्या घेतलेल्या सर्व वाहनांमध्ये ‘एक्सयूव्ही300’ ही सर्वात जास्त सुरक्षित असल्याचा हा निर्वाळा आहे. 19.4 अब्ज उलाढाल असलेल्या महिंद्रा समुहातील महिंद्रा अँड महिंद्रा लि. या कंपनीने आज ही माहिती प्रसिद्ध केली.

‘ग्लोबल एनसीएपी’ने (जीएनसीएपी) या कालावधीत 38 हून अधिक वाहनांच्या सुरक्षिततेचे मूल्यांकन केले. त्यांत ‘एक्सयूव्ही300’ने सर्वात जास्त सुरक्षा मानांकने मिळविली. ‘एक्सयूव्ही300’ने संयुक्त प्रवासी सुरक्षितता श्रेणीमध्ये सर्वाधिक मानांकने मिळवली. यामध्ये प्रौढ प्रवासी सुरक्षिततेसाठी ‘ग्लोबल एनसीएपी 5-स्टार’ मानांकन आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी ‘4-स्टार’ मानांकन या मॉडेलला मिळाले आहे. हे लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठीचे मानांकन भारतात प्रथमच एखाद्या वाहनाला मिळालेले आहे.

या जागतिक सुरक्षा मान्यतेवर भाष्य **करताना महिंद्रा अँड महिंद्रा लि.चे ऑटोमोटिव विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वीजय नाकरा** म्हणाले, “आमच्यासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. या वर्षाच्या सुरूवातीस, ‘एक्सयूव्ही300’ला ‘जीएनसीएपी’ने भारतातील सर्वात सुरक्षित वाहन म्हणून मानांकन दिले होते आणि आता गेल्या 6 वर्षातील हे सर्वात सुरक्षित वाहन म्हणून ओळखले गेले आहे. यातून सुरक्षिततेसाठीची आमची दृढ वचनबद्धता प्रतीत होते. स्वदेशात विकसीत झालेला एक ब्रँड सुरक्षिततेमध्ये जागतिक पातळीवर अव्वल ठरल्याने भारतीय वाहन उद्योगासाठी ही मोठीच कामगिरी ठरली आहे. महिंद्रा समुहात आमच्या सर्व वाहनांच्या अगदी हृदयात सुरक्षा वसलेली आहे. भविष्यातही आमच्या सर्व वाहनांमध्ये आम्ही सुरक्षेचे वाढीव निकष लागू करू."

‘महिंद्रा एक्सयूव्ही300’मध्ये ग्राहकांना सुरक्षाविषयक 50 वैशिष्ट्ये मिळतात. यातील काही वैशिष्ट्ये या सेगमेंटमध्ये प्रथमच देण्यात आलेली आहेत; उदा. **सात एअरबॅग्ज, सर्व चार चाकांवर डिस्क ब्रेक, फ्रंट पार्किंग सेन्सर्स आणि हीटेड ओआरव्हीएम,** आदी. या अनोख्या वैशिष्ट्यांमुळे या वाहनाला एखाद्या किल्ल्यासारखी सुरक्षा मिळते.

आज, ‘एक्सयूव्ही300’ने वाहन सुरक्षेच्या दृष्टीने एक नवीन बेंचमार्क स्थापित केला आहे. ग्राहक कार सुरक्षा चाचणी संस्थांमध्ये मध्यवर्ती स्थान असलेल्या ‘ग्लोबल एनसीएपी’ने ‘एक्सयूव्ही300’ला ‘5-स्टार’ मानांकन दिले आहे. खरे तर ‘जीएनसीएपी’कडून “सेफर चॉईस अवॉर्ड” देण्यात आलेली महिंद्रा ही भारतातील पहिली आणि एकमेव उत्पादक कंपनी आहे. या वर्षाच्या सुरूवातीस जर्मनीमध्ये ‘महिंद्रा एक्सयूव्ही300’ची ग्लोबल एनसीएपीतर्फे अधिकृत चाचणी घेण्यात आली होती.

**<u>‘एक्सयूव्ही300’मधील किल्ल्यासारखी अभेद्य सुरक्षा</u>**

- एक्सयूव्ही300 देते **बेस्ट-इन-सेगमेंट** सुरक्षा वैशिष्ट्ये* :
- **या सेगमेंटमध्ये प्रथमच** 7 एअरबॅग्ज - नी-एअरबॅग, ड्युअल-फ्रंट, साइड आणि कर्टन एअरबॅग्ज
- **या सेगमेंटमध्ये प्रथमच** सर्व 4 चाकांवर डिस्क ब्रेक (सब-4-मीटर कॉम्पॅक्ट एसयूव्हीमध्ये).
- **या सेगमेंटमध्ये प्रथमच** फ्रंट आणि रिअर पार्किंग सेन्सर्स
- **या सेगमेंटमध्ये प्रथमच** हीटेड आउटर रिअर व्ह्यू मिरर (ओआरव्हीएम)
- ऑटो-डिमिंग इनर रिअर व्ह्यू मिरर (आयआरव्हीएम)

- डायनॅमिक स्टीयरिंग टॉर्क, हायड्रॉलिक ब्रेक असिस्ट, रोल-ओव्हर मिटीगेशन आणि ट्रॅक्शन कंट्रोल, तसेच हिल स्टार्ट असिस्टसह इलेक्ट्रॉनिक स्टॅबिलिटी कार्यक्रम.
- कोलॅप्सिबल स्टीअरिंग आणि साइड इंट्यूशन बीम
- सर्व प्रकारांमध्ये एबीएस आणि इबीडी मानक
- अनुकूलन मार्गदर्शक तत्त्वांसह मागील कॅमेरा
- अँटी थेफ्ट अलार्म
- प्री-टेन्शनर आणि लोड-लिमिटरसह सीट बेल्ट्स
- फ्रंट व रिअर फॉग लॅम्प्स
- आयसोफिक्स चाईल्ड सीट अँकर्स
- टायर-ट्रॉनिक्स (चाकांतील हवा व तपमान देखरेख प्रणाली)
- सर्व 5 सीट्ससाठी सीट बेल्ट रिमाइंडर
- सर्व सीट्सवर 3-पॉईंट सीट बेल्ट
- टायर-पोझिशन डिस्प्ले
- ऑटो हेडलॅम्प्स
- ऑटो वायपर
- स्पीड सेन्सिंग डोअर लॉक
- प्रभाव सेन्सिंग डोअर अनलॉक

**सोशल मीडिया अपडेट्ससाठी पुढील हॅशटॅग्ज, हॅंडल्स वापरा**

#SafetyForAll
#SafeMahindra
#MahindraXUV300
@MahindraXUV300
@MahindraRise

**'महिंद्रा'विषयी**

महिंद्रा उद्योग समूह हा 19.4 अब्ज डॉलर्स इतकी उलाढाल असलेल्या कंपन्यांचा महासंघ आहे. नाविन्यपूर्ण वाहने बनविणे, ग्रामीण प्रगतीला चालना देणे, शहरी जीवनमान सुधरविणे, नवीन व्यवसायांची जोपासना करणे आणि समाजाला सोयी-सुविधा पुरविणे हे कार्य हा समूह करीत आहे. युटिलिटी मोटारी, माहिती तंत्रज्ञान, अर्थसेवा आणि पर्यटनविषयक सेवा आदी उद्योगांमध्ये हा समूह आघाडीवर आहे .जातात बनविले ट्रॅक्टर संख्येने सर्वाधिक जगात समुहातर्फे महिंद्र .अपारंपरीक ऊर्जा, कृषी उद्योग, लॉजिस्टिक्स, रिअल इस्टेट विकसन अशा इतरही अनेक क्षेत्रांमध्ये महिंद्र उद्योगसमूह आपले पाय रोवून आहे. भारतात मुख्यालय असलेल्या महिंद्राच्या शंभर देशांमध्ये विविध कंपन्या आहेत व त्यांमध्ये दोन लाख 56 हजारांहून अधिक कर्मचारी काम करतात.

'महिंद्र' विषयक अधिक माहिती जाणून घेण्यासाठी www.mahindra.com / ट्विटर व फेसबुक @MahindraRise

**मीडिया संपर्क माहिती**

मोहन नायर
उपाध्यक्ष (कम्युनिकेशन्स)
महिंद्रा अँड महिंद्रा लि.
लँडलाईन – + 91 22 28468510
इमेल – nair.mohan@mahindra.com

--